# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 10/05/2023 (बुधवार) दुपार

---

### जबरी संभोग

**पो.स्टे. रामटेक :–** दिनांक १२/०६/२०२२ ते दिनांक ११/०३/२०२३ चे १७.०० वा. ते ०५.३० वा. पर्यत यातील फिर्यादी व आरोपी नामे– चैत्रराम सेलोकर, वय ३४ वर्ष, रा. बेला त. जि. भंडारा हे विवाहित असुन आपआपले साथीदार पासुन वेगळे झाले असुन एकमेकांसोबत दुसरे लग्न करायचे असल्याने एकमेकांचे संपर्कात येवुन मोबाईलवर बोलणे चालणे सुरू झाले व आरोपीने फिर्यादी सोबत लग्न करण्याचे आमिश देवुन फिर्यादिला वेळोवेळी आपल्या बाईकवर फिरायला नेवुन पराग रेस्टॉरेन्ट मध्ये किरायाची रूम बुक करून रूममध्ये लैगिक संबंध प्रस्थापित केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम ३७६, ३७६ (२), ३७६(१) भा.द.वि कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास मसपोनी यावले मॅडम पोस्टे रामटेक मो. नं. ९०११६५५२८४ या करीत आहे.

### चोरी

**पो.स्टे. पारशिवनी** :– अंतर्गत १६ कि.मी. अंतरावरील मौजा डुमरीकला शिवार येथे दिनांक ०७/०५/२०२३ चे १९.०० वा. ते दिनांक ०८/०५/२०२३ चे १४.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– लक्ष्मीकांत मधुकर डेंगे, वय २५ वर्ष, रा. डुमरीकला ता. पारशिवनी यांचे डुमरीकला शिवारातील शेतामध्ये पाणी देण्याकरीता बोअरवेल लावलेली होती त्या बोअरवेल मधील १) आर्शिवाद कंपनीची समरसीबल कंपनीची मोटर किंमती अंदाजे १०,०००/–रू २) एल. टी. कंपनीचा स्टार्टर किंमती अंदाजे ६०००/–रू ३) ४ एम. एम चे केबल वायर किंमती अंदाजे ३०००/–रू ४) २५० फुट रस्सी (दोर) व बोअरवेलवर ठेवलेले लोखंडी कॅप (झाकण) किंमती अंदाजे १०००/–रू असा एकुण २०,०००/–रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा ५०३ वरखडे मो. क्र. ९७६३२१५४६५ हे करीत आहे.

# मोटारपंप चोरी

**पो.स्टे. भिवापूर** :— अंतर्गत रा. तास ता. भिवापुर जि. नागपुर येथे दिनांक ०८/०५/२०२३ चे ०८.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— अनील बलारामजी चौके, वय ४३ वर्षे रा. तास ता. भिवापुर जि. नागपुर याचे शेताला लागुन नाला असल्याने नाल्यातील पाणी शेतात पुरविण्यासाठी मोनोबॅक कंपनीची एस. एच. पी मोटारपंप किंमती अंदाजे १००००/—रू. लावली होती ती **आरोपी नामे— १) प्रशांत काशीनाथ मारबते, वय २४ वर्ष, २) लोकेश रामचंद्र मारबते वय २२ वर्षे दोन्ही रा. गाडेघाट पुर्नवसन ता. भिवापुर ३) राहुल विश्वास ढाकरे वय २१ वर्षे रा. घाटउमरी ता. भिवापुर** यांनी चोरून नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. भिवापूर येथे आरोपीतांविरुध्द कलम ३७९ भादंवी कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोहवा १३९९ विठ्ठल तितरमारे मो. नं. ९८२३११२३९९ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**